# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक ०३ रा बुधवार दि.२९ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## छ. संभाजीनगरमध्ये ‘सट्टा’बाजार गरम



छ. संभाजीनगर : प्रतिनिधी लोकसभा निवडणूक निकालापूर्वी ‘सट्टा’बाजार गरम झाला आहे. महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे, एमआयएमचे इम्तियाज जलील, महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या नावांवर अनेकांनी बुकींकडे पैसे लावले आहेत. धनुष्यबाण, मशाल आणि पतंगावरून सट्टाबाजार ४ जूनपर्यंत आणखी गरम होईल. ब्लॅक मार्केटमधील समांतर अर्थव्यवस्था म्हणून सट्टाबाजाराकडे पाहिले जाते. सट्टा हा अंदाज बांधणारा जुगार आहे. यामध्ये नशिबाच्या आणि विश्लेषणाच्या जोरावर अनेक जण लाखो रुपये लावतात. यात काही मालमाल, तर अनेक जण कंगाल होतात. १३ मे रोजी मतदान झाल्यानंतर सट्टाबाजारामध्ये महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे हे फेव्हरेट होते. खा. जलील यांच्या नावावर व खैरे यांच्या नावावर सट्टा लावण्याचे प्रमाण कमी होते. मराठवाड्यातील जालना आणि बीड मतदारसंघांच्या निकालावरूनही सट्टाबाजारात दणकावून पैसा लावल्याची चर्चा आहे. जालन्यातून महायुतीचे उमेदवार रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, तर महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्यात जोरदार लढत होणार असल्याची चर्चा आहे. बीडमध्ये महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे आणि महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्यातही सट्टाबाजारात काँटे की टक्कर आहे.

## चंदिगढमध्ये भाजपची हॅट्रिक

चंदिगढ : वृत्तसंस्था चंदिगढ या केंद्रशासित प्रदेशात शेवटच्या टप्प्यात म्हणजे एक जून रोजी मतदान होत आहे. चंदिगढ मतदारसंघात काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांनी उमेदवार बदलल्याने निवडणूक चुरशीची बनली आहे.काँग्रेसने गतवेळचे उमेदवार पवन बन्सल यांना डावलत मनीष तिवारी यांना संधी दिली आहे. तर भाजपने अभिनेत्री किरण खेर यांचे तिकिट कापत संजय टंडन यांना मैदानात उतरवले आहे. अभिनेते अनुपम खेर यांच्या पत्नी किरण खेर यांनी सलग दोन निवडणुकांत या ठिकाणी विजय मिळवला होता.मात्र मतदारसंघात त्या फारशा फिरकत नसल्याची स्थानिक नागरिकांची तक्रार होती. या पार्श्वभूमीवर भाजपने त्यांचे तिकिट कापले. मतदानाची तारीख तोंडावर असली तरी चंदिगढमध्ये निवडणूक असल्याचे वातावरण नाही. गतवेळच्या निवडणुकीत पक्षांनी राष्ट्रीय मुद्यांवर भर दिला होता. यावेळी बेरोजगारी, महागाई आणि स्थानिक मुद्दे प्रचारात अग्रस्थानी आहेत. महत्त्वाचे म्हणजे घरोघरी जाऊन आपले मुद्दे पटवून देण्याचे काम प्रमुख पक्षांचे कार्यकर्ते करीत आहेत.चंदिगढ मतदारसंघात सर्वप्रथम १९६७ मध्ये निवडणूक झाली होती. काँग्रेसचे वरिष्ठ नेते पवन बन्सल यांनी चारवेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. यात एका हॅट्रिकचा समावेश आहे. मात्र त्यानंतर सलग दोनदा त्यांना किरण खेर यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता.काँग्रेसचे उमेदवार मनीष तिवारी यांना राष्ट्रीय राजकारणाचा दीर्घ अनुभव आहे. केंद्रात मंत्री म्हणून तसेच पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून त्यांनी काम केले आहे. या अनुभवाचा प्रचारात पुरेपूर वापर करण्याचा तिवारी यांचा प्रयत्न आहे. स्थानिक समस्यांवर समोरासमोर बसून चर्चा करण्याचे आव्हान तिवारी यांनी टंडन यांना दिले.



## भिवंडीत भाजपमधील वाद चव्हाट्यावर

ठाणे : प्रतिनिधी भिवंडी लोकसभा मतदारसंघात भाजपचे कपिल पाटील आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा यांच्यात लढत झाली. तुल्यबळ उमेदवार असल्याने पाटील यांच्यासमोर तगडे आव्हान उभे ठाकले. त्यामुळे यावेळी अंदाज बांधणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे यावेळी भाजपचे कपिल पाटील यांना पक्षातीलच काही लोकांनी दगा दिल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे कपिल पाटील संतापले असून, आता त्यांनी थेट करेक्ट कार्यक्रमाची भाषा केली आहे. त्यामुळे भिवंडीत लोकसभेच्या निवडणुकीपूर्वीच पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.भिवंडी लोकसभा मतदारसंघातील भाजपचे आमदार किसन कथोरे आणि भाजपचे उमेदवार कपिल पाटील यांच्यात सख्य नाही. त्यामुळे सातत्याने कोणत्या ना कोणत्या रुपाने सामना पाहायला मिळतो. आता राज्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. आता सर्वांनाच निकालाची प्रतीक्षा आहे. त्यावर लक्ष केंद्रित झालेले असताना आता काही ठिकाणी पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर येऊ लागला आहे. भिवंडीत कपिल पाटील आणि आमदार किसन कथोरे यांच्यात वाजली आहे. लोकसभा निवडणुकीत आमदार किसन कथोरे यांनी विरोधी पक्षाच्या उमेदवाराला मदत केल्याचा आरोप महायुतीचे उमेदवार कपिल पाटलांनी केला. एवढेच नव्हे, तर पक्षाच्या विरोधात काम करणा-यांचा करेक्ट कार्यक्रम करणार असल्याचेही कपिल पाटील म्हणाले.भिवंडी लोकसभेच्या प्रचारादरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आमदार किसन कथोरेंची भेट घेतली होती. लोकसभा निवडणुकीत कथोरे हे कपिल पाटलांना मदत करतील, अशी गॅरंटीही घेतली होती. मात्र ही गॅरंटी फेल घालवल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अशा माणसाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही माफ करणार नाहीत, असे कपिल पाटील म्हणाले. निवडणुकीनंतर त्यांनी हे वक्तव्य केल्याने पक्षांतर्गत वाद पेटण्याची चिन्हे आहेत. किसन कथोरे हेही तगडे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्यात आता वादाची ठिणगी पडली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीआधी हा वाद उफाळून आल्याने येत्या काळात याच्या झळा अधिक तीव्र होताना दिसतील, असे बोलले जात आहे.मुरबाड येथील एका कार्यक्रमात भिवंडी लोकसभेचे उमेदवार कपिल पाटील आले होते. त्यावेळी बोलताना त्यांनी भाजप पक्षात असून ज्यांनी पक्षाच्या विरोधात काम केले त्यांचा करेक्ट कार्यक्रम करणार आहे, असा इशारा त्यांनी दिला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारादरम्यान मुरबाडमध्ये येऊन आमदार किसन कथोरे यांच्यासोबत एका ठिकाणी बैठक घेऊन त्यांची गॅरंटी घेतली होती. आता त्यांची गॅरंटी फेल घालवणा-या माणसाला देवेंद्रजीही माफ करणार नाहीत, अशा शब्दांत त्यांनी सुनावले. आमदार किसन कथोरे यांनी भाजप पक्षाच्या विरोधात काम केले असून त्यांनी विरोधी पक्षाच्या उमेदवारांची मदत केली असल्याची चर्चा आहे.

## इंडिया आघाडीची १ जूनला बैठक



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. अशा परिस्थितीत निकालापूर्वीच इंडिया आघाडीची दिल्लीत १ जूनला बैठक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. देशभरात लोकसभा निवडणुकीची गेले दीड महिने धामधूम पाहायला मिळाली. त्यात देशभरात एनडीए विरुद्ध इंडिया आघाडी अशी काटे की टक्कर पाहायला मिळाली. आता लोकसभा निवडणुकीचा शेवटचा टप्पा राहिला आहे. त्यात १ जून रोजी इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांची महत्वपूर्ण बैठक दिल्लीत बोलावण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या बैठक कशासाठी आहे? इंडिया आघाडीचा काय प्लॅन आहे? उद्धव ठाकरे शरद पवार उपस्थित राहणार का? असे अनेक प्रश्न चर्चेत आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. अशा परिस्थितीत निकालापूर्वीच इंडिया आघाडीची दिल्लीत १ जूनला बैठक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. निवडणुकीनंतरची परिस्थिती लक्षात घेऊन होणा-या बैठकीत आपापसांत एकजूट ठेवण्याचा प्रयत्न आणि पुढील तयारीची रणनीती या बैठकीत ठरणार आहे. १ जून रोजी दिल्लीत होणा-या इंडिया आघाडीच्या बैठकीत सर्व मित्रपक्षांना सहभागी होण्याचं निमंत्रण देण्यात आले आहे. निवडणूक आणि निकालानंतरच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक होत असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे या बैठकीला देशातील घटक पक्षाचे आणि राष्ट्रीय पक्षाचे कोणते महत्वाचे नेते उपस्थित राहतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.३

इंडिया आघाडीची बैठक अशा वेळी होत आहे जेव्हा लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठी मतदान होत आहे. निवडणूक निकालापूर्वी विरोधी पक्षनेत्यांची ही बैठक घेतली जात आहे. याबाबत अद्याप स्पष्टपणे काहीही सांगण्यात आलेलं नाही, परंतु आम आदमी पार्टीचे निमंत्रक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनाचा शेवटचा दिवस आहे, त्या दिवशी ही बैठक नियोजित करण्यात आली आहे. दिल्लीत होणा-या इंडिया आघाडीच्या बैठकीला शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे जाण्याची शक्यता कमी आहे. कारण उद्धव ठाकरे सध्या परदेशात आहेत. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे या बैठकीला जाऊ शकतात आणि ठाकरे गटाकडून या बैठकीला पक्षाचा प्रतिनिधी पाठवला जाईल. तसेच, शरद पवार देखील परदेशात आहेत, ते थेट एक जूनला दिल्लीत उपस्थित राहतील. लोकसभा निवडणुकीचे निकाल काय लागतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकीकडे भाजप निवडणुकीनंतर शांत पाहायला मिळत आहेत. तर दुसरीकडे निकाल लागल्यावर इंडियाची रणनीती काय असणार? याविषयी इंडिया एक जूनला होणा-या इंडिया गाडीच्या बैठकीत सगळे ठरणार आहे.

## उमर खालिदचा कोर्टाने पुन्हा जामीन अर्ज फेटाळला

नवी दिल्ली : दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठ अर्थात जेएनयूचा माजी विद्यार्थी नेता उमर खालिद याचा जामीन अर्ज आज दिल्लीच्या कारकरदुमा कोर्टाने फेटाळला. दिल्लीतील २०२० मधील दंगल प्रकरणातील तो आरोपी आहे. या प्रकरणात नियमित जामिनासाठी त्यानं अर्ज केला होता. दुस-यांचा त्याचा जामीन फेटाळण्यात आला आहे.कडकडडुमा कोर्टाचे अतिरिक्त न्यायाधीश समीर वाजपेयी यांच्या कोर्टाने उमर खालीदचा जामीन फेटाळला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये ट्रायल कोर्टाने उमर खालीदचा जामीन अर्ज फेटाळून लावला होता. सुप्रीम कोर्टाकडून दिलासा न मिळाल्याने त्याने पुन्हा नव्याने याचिका दाखल केली होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये जामीन देण्यास नकार दिल्याच्या आदेशाला खालीदने दिल्ली हायकोर्टात आव्हान दिले होते.उमर खालीदवर काय आहेत आरोप? दिल्लीमध्ये फेब्रुवारी २०२२ मध्ये दंगल झाली होती. या दंगलीचा कट उमर खालीदसह इतरांनी रचल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. या दंगलीत ५३ जण ठार झाले होते तर ७०० पेक्षा अधिक जण जखमी झाले होते. देशात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केल्याचा ठपका उमर खालीदवर ठेवण्यात आला आहे. त्यासाठी बेकायदा कारवाया प्रतिबंध कायदा अंतर्गत त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मतमोजणी प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### मतमोजणी विषयक विविध पथकांचे प्रशिक्षण



लातूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार असून यासाठी विविध पथके गठीत करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत आणि अचूक होण्यासाठी या पथकातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या दयानंद सभागृह येथे आयोजित प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, प्रियांका आयरे, संगीता टकले, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, शरद झाडके, मंजुषा लटपटे, सुशांत शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह सर्व तहसीलदार, मतमोजणीसाठी नियुक्त पर्यवेक्षक, मतमोजणी अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. मतमोजणी प्रक्रिया अचूकपणे आणि विहित कालावधीत होण्यासाठी सर्वांनी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतमोजणी विषयक निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी. प्रत्येक विधानसभा क्षेत्रनिहाय स्वतंत्र कक्षात मतमोजणी होणार असून टपाल मतपत्रिका मोजण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतमोजणी करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह या माहितीची नोंद करणाऱ्या अधिकाऱ्यांनीही अतिशय काळजीपूर्वक माहिती नोंदवावी. प्रत्येकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी, असे जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे म्हणाल्या. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी यावेळी मतमोजणी कक्षाबाबत माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी मायक्रो ऑब्झर्व्हर यांची कर्तव्ये, मतमोजणी आकडेवारीच्या तक्त्याबाबत मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांनी सैनिकांच्या मतपत्रिका मोजणीची कार्यपद्धती सांगितली. उपजिल्हाधिकारी संगीता टकले आणि प्रियांका आयरे यांनी टपाली मतपत्रिका मोजणीबाबत मार्गदर्शन केले. उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी प्रदीप डूमणे यांनी एनकोर प्रणालीबाबत माहिती दिली. उपविभागीय अधिकारी शरद झाडके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी मतदान यंत्राद्वारे मतमोजणी याबाबत मार्गदर्शन केले. उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे आणि अरुणा संगेवार यांनी सिलिंग प्रक्रीयेबाबत मार्गदर्शन केले.

## लातूर तहसीलच्या मंडल अधिकारी व तलाठ्यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करा, अन्यथा तीव्र आंदोलन करणार-रमेश पाटील



लातूर - लातूर तहसिल कार्यालयात अंतर्गत सेवारत असलेले अनेक मंडळाधिकारी व तलाठी हे भ्रष्ट कारभार करीत असून त्यांच्या फोनचे सिडीआर तपासून यांचे प्राप्रटींची व भ्रष्ट कारभाराची कसून चौकशी करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे माजी तालुकाप्रमुख रमेश पाटील यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकार्यांमार्फत २७ मे रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की, लातूर तहसिल कार्यालयातील मंडळ अधिकारी , मंडळ अधिकारी बाभळगांव, मंडळ अधिकारी लातूर शहर व तलाठी हरगुंळ (बु) तलाठी कासारगांव सज्ञा यांनी मोठया प्रमाणात अनाधिकृतपणे मोठया प्रमाणपत्र गौन खनिज, मुरुम खंडीकेंद्र यांचे हप्ते घेवन लुटमार करत आहेत व विचारणा केली असता उडवा उडवीचे उत्तरे देत आहेत. आम्ही वरिष्ठापर्यंत हप्ते देतो. असे उद्धटपणे बोलत आहेत. ७ ते ९ एप्रिलच्या रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कव्हा नाका येथे कासरगावचे तलाठी, बु. चे मंडळ अधिकारी यांनी वाळूचे व मुरुमाचे हप्ते बसवेश्वर चौकात बसून वसूल केल्याचा आरोप रमेश पाटील यांनी निवेदनात केला आहे. तहसीलदारच्या कोर्ट प्रकरणात हेच कर्मचारी शेतकर्यांच्या फेरफार रस्ते, कुळाचे प्रकरण व ईतर अन्य प्रकरणात वसुली हेच तीन लोक करतात.

गुंटेवारीची एकपण फाईल लाखो रुपये घेतल्या शिवाय अहवाल देत नाहीत व यांनी वेगवेगळी खाजगी माणसे वसुली करिता ठेवली आहेत.

बाभळगावचे मंडळ अधिकारी यांच्या हद्दीत बरेच ठिकाणी मुरूम व वाळूची चोरी होत आहे. यांत ते हप्ते घेवून डोळेझाक केली जात आहे.

लातूर तालूक्यातील तलाठयांना दडपशाहीने फेर करून घेतात व समोरच्याकडून लाखो रूपये घेतात. व त्यांच्या सज्ञात मुरुमाचे व वाळूचे अती उत्त्खनन आहे. हरगुळ (बु) मध्ये एकूण ५५ विट भट्टया आहेत. त्यांच्याकडून प्रत्येकी ३० हजार रुपये हप्ता घेतला जातो व टॅक्स कमी केला जातो, अशा भ्रष्ट तलाठी व मंडळ अधिकारी यांची तात्काळ चौकशी करून यांच्यावर कठोर कार्यवाही कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनात रमेश पाटील यांनी केली आहे.

## संपादकीय....

# कृत्रिम बुद्धिमत्तेतील नवक्रांती

'एआय'च्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) सामर्थ्याबद्दल जगात अनेक प्रश्न, मतमतांतरे आणि शंका-कुशंका असल्या तरी एक गोष्ट निश्चित आहे की, येणार्या काळात ते क्रांतिकारी बदलांचे वाहन ठरणार आहे. याचे कारण कृत्रिम बुद्धिमत्ता सतत नावीन्यपूर्ण आणि शक्तिशाली तंत्रज्ञानाला जन्म देत आहे. सध्या 'एआय' तंत्रज्ञानाच्या गुणवत्तेने सुसज्ज सर्च इंजिन उदयास येईल, याची चर्चा जगभरात होत आहे.'एआय'ने चालवलेले हे सर्च इंजिन वेळप्रसंगी वर्तमानात सर्च इंजिनच्या क्षेत्राचा अनभिषिक्त सम-ाट असणार्या गुगलच्या वर्चस्वालाही आव्हान देऊ शकते, असे बोलले जात आहे. 'ओपन एआय'कडून तयार केल्या जाणार्या या सर्च इंजिनची घोषणा कधीही होऊ शकते. असे म्हटले जाते की, 'ओपन एआय'ने या प्रकल्पासाठी मोहिमेत मोठ्या संख्येने गुगलच्या तज्ज्ञांचा समावेश केला आहे. त्यामुळे या नव्या सर्च इंजिनबाबतची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. तसेच या सर्च इंजिनाबाबत अपेक्षाही वाढल्या आहेत; कारण 'ओपन एआय'च्या चॅटजीपीटी या आविष्काराने आधीच धुमाकूळ घातला आहे. २०२२ च्या अखेरीस लाँच झालेल्या चॅटजीपीटीचे सद्यःस्थितीत जगभरात १०० दशलक्ष मासिक वापरकर्ते आहेत.

'ओपन एआय'च्या नवीन सर्च इंजिनच्या आगमनाने चॅटजीपीटीच्या क्षमतांचाही विस्तार होईल, असे सांगितले जात आहे. मायक्रोसॉफ्ट समर्थित 'ओपन एआय'साठी हे एक नवीन यश असेल. त्यामुळे कालातीत ज्ञानाच्या शोधात इंटरनेटवर सर्च इंजिन वापरणार्या जिज्ञासूंना अचूक माहिती मिळू शकेल. यासाठी या सर्च इंजिनद्वारे प्रदान केली जाणारी माहिती केवळ तांत्रिक असता कामा नये. मूळ मजकूर असो वा अनुवाद, त्यातील आशय व मांडणीत अचूकता असायला हवी. तसेच ही माहिती तार्किकदृष्ट्या सोपी असावी. तसे झाल्यास इंटरनेट जगतात नवीन 'एआय' आधारित सर्च इंजिनकडून क्रांतीचे नवे पर्व सुरू होऊ शकते.जगातील सर्वाधिक तरुण आणि प्रतिभा असलेला देश असलेल्या भारताला 'एआय' संचालित प्रणालीमध्ये पाय रोवण्यासाठी नवीन पुढाकार घ्यावा लागेल. मायक्रोसॉफ्ट, गुगल इत्यादी अनेक यशस्वी अमेरिकन कंपन्यांत भारतीय प्रतिभा अमूल्य योगदान देत आहे; पण त्याच वेळी या कंपन्यांची उत्पादने भारताचे आर्थिक शोषण करत आहेत. 'एआय'चे धोके आहेत, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. आपला मुकाबला एका शक्तिशाली तंत्रज्ञानाशी आहे. विकासासाठी त्याची गरज आहे; पण त्याच्या धोक्यांपासून सावध राहण्याचीही गरज आहे.

भविष्यात प्रगत देशांकडून त्याचा गैरवापर होण्याची शक्यताही कमी नाही. अशा परिस्थितीत 'एआय'च्या मदतीने या दिशेने सावधपणे पुढे जावे लागणार आहे; पण बाजाराधिष्ठित जागतिक व्यवस्थेकडून शोषण करण्यासाठी त्याचा वापर केला जाऊ नये यासाठी त्यासंदर्भातील नियमन योग्य व्हायला हवे. यासाठी कठोर कायदे आणण्याची गरज आहे, जेणेकरून सर्वसामान्यांचे हित जपले जाईल. तंत्रज्ञान असो वा कृत्रिम बुद्धिमत्ता असो, हे एखाद्या ऊर्जेसारखे आहे. तिचा जपून वापर केल्यास मिळणारे फायदे अगणित असतील. याउलट निष्काळजीपणा दाखवल्यास ती खूप घातकही आहे.

सध्याच्या व्यवस्थेतील कृत्रिम बुद्धमत्तेच्या धोक्यांची सरकारांनी काळजी घ्यायला हवी. त्याचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी झाला तर चांगलेच आहे; पण ते मानवी नियंत्रणात राहणेही महत्त्वाचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या धोक्यांसाठी आपण स्वत:ला तयार केले नाही, तर ती मानवी संस्कृतीसाठी घातक ठरू शकते, असा इशाराही पाश्चात्त्य जगातील तज्ज्ञ देत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून यंत्रांना मानवाप्रमाणे विचार करण्याची, वागण्याची व निर्णय घेण्याची क्षमता दिली जात असल्याने जगासाठी अनेक प्रकारचे धोके निर्माण होताहेत. अशा वेमी लोकसंख्येच्या बाबतीत जगात प्रथम स्थानी असणार्या भारताच्या धोरणकर्त्यांना प्रत्येक हाताला काम देण्याचे उद्दिष्ट पूर्ण करताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा धोक्यांचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे.

# बँकांची नफादायक कामगिरी


देशाच्या मध्यवर्ती रिझर्व्ह बँकेने या वर्षासाठी तब्बल २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये ऐतिहासिक लाभांश केंद्राला जाहीर केला आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांना तब्बल १.४० लाख कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. त्याचप्रमाणे मागील वर्षाच्या तुलनेत त्यात ३५ टक्के वाढ झाली आहे. त्यांची वार्षिक व्यवसायवृद्धी ३४ टक्के झाली आहे. मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बारा राष्ट्रीयीकृत बँकांची नेत्रदीपक कामगिरी झाली असून त्यांनी केंद्र सरकारला भरघोस लाभांश दिला आहे. मार्च २०२३ या तुलनेत सार्वजनिक क्षेत्रातील या बँकांनी ३० टक्के जास्त लाभांश केंद्र सरकारला दिला आहे. राष्ट्रीयीकृत बँकांच्या कामगिरीचा घेतलेला धावता आढावा.

सार्वजनिक बँका

केंद्र सरकारची प्रमुख मालकी असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मार्च २०२४ अखेरच्या वर्षामध्ये उत्तम आर्थिक कामगिरी केलेली आहे. केवळ मुदत ठेवींमध्ये वाढ न करता कर्जवाटपामध्येसुद्धा या बँकांनी चांगली कामगिरी नोंदवली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील एकूण १२ बँकांपैकी स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक व बँक ऑफ इंडिया या चार बँकांनी दहा टक्क्यांपेक्षा जास्त वार्षिक वाढ नोंदवलेली आहे. साहजिकच या बँकांचे वर्षाअखेरचे नफ्याचे प्रमाण तुलनात्मकरित्या चांगले राहिले असून या वर्षी त्यांनी विक्रमी नफा मिळवलेला आहे.

परिणामतः गुंतवणूकदारांना व विशेषतः केंद्र सरकारला यामुळे मोठा लाभांश मिळणार आहे. मार्च २०२३ या वर्षी अखेरीस या सर्व बँकांनी केंद्र सरकारला तब्बल १३ हजार ८०४ कोटी रुपये लाभांश दिला होता. त्यात यावेळी भरघोस म्हणजे तब्बल ३० टक्के वाढ होत असून यावर्षी अखेरीस केंद्राला लाभांशापोटी १८ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. केंद्र सरकारला सर्वाधिक लाभांश देणार्या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियासह बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक व इंडियन बँक यांचा समावेश आहे. बँक ऑफ इंडिया व इंडियन ओव्हरसीज बँक या दोन्ही बँकांचा लाभांश लवकरच जाहीर होईल.




सार्वजनिक बँका लाभांश

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा निव्वळ नफा गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी ३७ टक्क्यांनी वाढलेला असून तो जवळजवळ १ कोटी ४० लाख रुपये झाला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने या सर्व बँकांमध्ये सर्वोत्तम नफा कमावला आहे. त्यांनी ६१ हजार ७७ कोटी रुपये नफा मिळवला आहे. या बँकेच्या शेअरची दर्शनी किंमत एक रुपया असून त्यांनी सर्वाधिक म्हणजे प्रति शेअर १३.७० रुपये लाभांश दिला आहे. मार्च २०२३ अखेरच्या वर्षात हा लाभांश ११.३ रुपये होता. केंद्र सरकारला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून मिळणार्या लाभांशापैकी ३९ टक्के लाभांश केवळ स्टेट बँक ऑफ इंडियाकडून मिळणार आहे. त्या खालोखाल बँक ऑफ बडोदा या बँकेनेही दोन रुपये दर्शनी मूल्य असलेल्या शेअरवर ७.६० रुपये लाभांश जाहीर केला आहे.

हा दर्शनी मूल्यावर ३८० टक्के लाभांश होतो. स्टेट बँक ऑफ इंडिया पाठोपाठ बँक ऑफ बडोदा केंद्र सरकारला सुमारे १४ टक्के लाभांश देते. या पाठोपाठ कॅनरा बँकेनेही लाभांश नुकताच जाहीर केला असून केंद्र सरकारच्या एकूण लाभांशापैकी दहा टक्के लाभांश कॅनरा बँकेचा होणार आहे. या बँकेने दहा रुपये दर्शनी मूल्याच्या शेअरवर १६.१० रुपये लाभांश दिला आहे. टक्केवारीच्या आकड्यात सांगायचे झाले तर या बँकेने १६१ टक्के लाभांश दिला आहे. मार्च २०२३ मध्ये त्यांनी १२ रुपये लाभांश दिलेला होता. या तीन प्रमुख बँकांच्या पाठोपाठ इंडियन बँकेच्या संचालकांनीही नुकताच त्यांचा प्रति शेअर १२ रुपये लाभांश जाहीर केला आहे. गेल्या वर्षी या बँकेने ८.६० रुपये लाभांश दिलेला होता. त्यांनी नफ्यात ५३ टक्के वाढ नोंदवून ८ हजार ६३ कोटी रुपये नफा कमावला आहे.

केंद्र सरकारला मिळणार्या एकूण लाभांशामध्ये या बँकेचा सुमारे ७ टक्के वाटा आहे. पंजाब नॅशनल बँकेने ८ हजार २४५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून त्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत २२८ टक्के वाढ झाली आहे. युनियन बँक ऑफ इंडियाने १३ हजार ६४९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात ६२ टक्के वाढ झाली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियानेही गेल्या वर्षीच्या तुलनेत नफ्यामध्ये ६१ टक्के वाढ नोंदवून २ हजार ५४९ कोटी रुपये नफा मिळवला आहे. बँक ऑफ इंडियाने ५७ टक्के वाढ नोंदवून ६ हजार ३१८ कोटी रुपये नफा मिळवला आहे. मात्र या १२ बँकांपैकी केवळ पंजाब आणि सिंध या बँकेने गेल्या वर्षाच्या तुलनेत ५५ टक्के कमी नफा मिळवला. १३१३ कोटी रुपयांवरून तो ५९५ कोटी रुपयांवर घसरला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

सर्व राष्ट्रीयीकृत बँकांच्या जोडीलाच देशाची मध्यवर्ती बँक असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मार्च २०२४ या वर्षासाठी केंद्र सरकारला ऐतिहासिक लाभांश नुकताच जाहीर केला. ही रक्कम तब्बल २ लाख १० हजार ८७४ कोटी रुपये इतकी आहे. यामुळे केंद्रीय अंदाजपत्रकातील चालू आर्थिक वर्षातील वित्तीय तूट भरून काढण्यास मोठा हातभार लागणार आहे. सर्व राष्ट्रीयीकृत बँकांप्रमाणेच रिझर्व्ह बँकेची या वर्षातील एकूण कामगिरी खूप उत्तम झाल्याचे हे द्योतक आहे. रिझर्व्ह बँकेला परकीय चलन, सरकारी रोख्यांची खरेदी विक्री, ठेवी, अल्पमुदतीची बँकांना कर्जे तसेच राज्य व केंद्र सरकार यांच्या कर्जातील कमिशन यातून उत्पन्न मिळते.

केंद्र सरकारचे धोरण

केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांमध्ये अनुत्पादित कर्जांबाबत आखलेले सर्वंकष धोरण तसेच थकीत कर्जाची वसुली धोरण सहाय्यकारी ठरले आहे. बँकांना भागभांडवली सहाय्यापोटी गेल्या पाच वर्षांत ३ लाख १० हजार ९९७ कोटी रुपये दिले. वित्तीय यंत्रणेमध्ये केलेल्या विविध सुधारणांपोटी राष्ट्रीयीकृत बँकांची कामगिरी चांगली झाली आहे. सर्व बँकांची कर्जवाटपाची कामगिरीही वाढलेली असून मार्च २०२४ या वर्षाच्या अखेरीस त्यांच्या कर्जवाटपात १६.३ टक्क्यांची वाढ झालेली आहे. नुकत्याच सुरू झालेल्या नवीन आर्थिक वर्षात म्हणजे मार्च २०२५ अखेरच्या वर्षामध्ये कर्जवाटपामध्ये साधारणपणे ११ ते १२ टक्के वाढ अपेक्षित आहे.

दरम्यान केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मोठ्या प्रकारच्या प्रकल्प कर्जांवर भर देण्यापेक्षा छोट्या व किरकोळ कर्जांवर जास्त भर द्यावा असे सुचवलेले आहे. अर्थात, कर्जवाटपातील हा बदल लगेचच होणे अपेक्षित नसले, तरी नजीकच्या भविष्यकाळात सर्वच बँकांनी किरकोळ कर्जांवर जास्त भर दिला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांच्या शेअर्सची नोंदणी मुंबई तसेच राष्ट्रीय शेअर बाजारांवर करण्यात आलेली असून गेल्या वर्षभरात बहुतेक सर्व बँकांच्या शेअर्सचे भाव तेजीत राहिलेले आहेत. त्यांच्या निव्वळ नफ्यामध्ये होत असलेल्या वाढीपोटी शेअर बाजारात बहुतेक सर्व बँकांचे भाव गेले वर्षभर तेजीत राहिले असून आणखी काही काळ ही तेजी कायम राहील अशी चिन्हे आहेत. या वर्षात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा निर्देशांक तब्बल ८०.७७ टक्क्यांनी वर गेलेला आहे. सरकारने गेल्या काही वर्षांत सार्वजनिक क्षेत्रातील २७ बँकांचे विलीनीकरण करून तो आकडा केवळ १२ वर आणला. राष्ट्रीयीकृत बँकांमधील ग्राहकसेवेचा दर्जा हा खूपच असमाधानकारक आहे. असे असूनही या वर्षात एकंदरीत देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची कामगिरी निश्चितच उत्साहवर्धक झालेली आहे.

# हृदयद्रावक घटना



दिल्लीच्या एका शिशु देखभाल केंद्र आणि बालकांच्या हॉस्पिटलला काल लागलेल्या भीषण आगीत सात अर्भके मृत्यूमुखी पडली आहेत. ही घटना घडली तेव्हा तिथे एकूण १२ अर्भके होती. त्यातील पाच जणांचा जीव वाचला असला, तरी ही अर्भके मृत्यूशी झुंज देत आहेत. मरण पावलेल्या अर्भकांपैकी एक २५ दिवसांचे होते तर बाकीची सहा अर्भके १५ दिवसांच्या आतील होती. ही घटना मनाचा थरकाप उडवणारी आहे. बेफिकिरी आणि अत्यंत अनास्थेच्या व्यवस्थेमुळे ही अर्भके होरपळून आगीच्या भक्षस्थानी पडली आहेत. ही बातमी वाचणार्या प्रत्येकाचे मन अस्वस्थ झाल्याशिवाय राहिले नसेल. वास्तविक नवज्यात शिशूंची अत्यंत नजाकतीने काळजी घेणे अपेक्षित असताना त्या केंद्रात कमालीची अव्यवस्था होती. आता ही घटना घडल्यानंतर या केंद्राच्या संबंधातील सारी माहिती बाहेर आली आहे.

त्यात म्हटले आहे की, मुळात या शिशुदेखभाल केंद्रात केवळ पाच अर्भकांच्याच उपचाराची अनुमती होती आणि तिथे त्याच्या क्षमतेच्या दुप्पट म्हणजे १२ अर्भके उपचारासाठी ठेवली गेली होती. विशेष म्हणजे या केंद्राचा परवाना गेल्या मार्च महिन्यातच संपला होता. केंद्राच्या व्यवस्थापकांची बेफिकिरी इतकी की त्यांनी त्याचे नूतनीकरण करण्याचीही फिकीर दाखवली नाही. मुळात पाच अर्भकांची व्यवस्था असताना तिथे बारा अर्भकांना उपचारासाठी ठेवण्याचा बेजबाबदारपणा का केला गेला, हा प्रश्न विचारण्यात आज अर्थ नाही. एकूणच दिल्लीत सगळी इमारतींची दाटीवाटी आहे. तिथे नियमानुसार बांधकाम, आगीच्या संबंधातील दक्षता घेण्यासाठीच्या तरतुदी असले काही प्रकार क्वचितच आढळतात. या शिशु उपचार केंद्राच्या इमारतीचीही तशीच व्यवस्था होती. इमारतीत इमर्जन्सी दरवाजाची सोय नव्हती.

त्यामुळे आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या कर्मचार्यांना इमारतीच्या खिडक्या तोडून आतील अर्भकांना बाहेर काढावे लागले. आग विझवणारी इमर्जन्सी यंत्रणा तिथे उपलब्ध ठेवण्याचेही भान या लोकांनी बाळगले नव्हते. त्यामुळे बाहेरचे जग पाहण्यापूर्वीच या अर्भकांना आपला जीव सोडावा लागला आहे. आता तांत्रिक अडचणींच्या संबंधात तिथे कारवाईचा देखावा होईल. आठ-पंधरा दिवस त्यावर चर्चा आणि उपाययोजनांचा ऊहापोह होईल. वातावरण शांत झाले की पुढे नेहमीसारखे सुरू राहील. अन्य बांधकाकांच्या संबंधात सुरक्षा नियमावलीकडे दुर्लक्ष केले गेले, तर एकवेळ त्याकडे कानाडोळा केला जाऊ शकतो, पण जिथे रुग्णालय किंवा लहानग्या बालकांच्या उपचाराची सोय होणार आहे तिथे तरी पुरेसे सुरक्षा उपाय योजणे आवश्यक नाही काय? त्या संबंधात पाहणी करणारी यंत्रणा किंवा त्यांचे निरीक्षक अर्थातच अर्थपूर्ण व्यवहार करून या जीवघेण्या अव्यवस्थेकडे दुर्लक्ष करीत असतील, तर अशा सर्वांचीच आता नीट झाडाझडती घेतली पाहिजे आणि त्यांच्यावर कोणतीही दयामाया न दाखवता बडतर्फीची कारवाई केली गेली पाहिजे.

जिथे ही घटना घडली त्या केंद्राचे नाव विवेक विहार केअर न्यू बॉर्न ॲन्ड चाइल्ड हॉस्पिटल असे आहे. तिथे बालकांवरील उपचारासाठी जी यंत्रे लावली गेली होती, ती वीजपुरवठ्याच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात होती व त्यातून कधीही शॉर्टसर्किट होण्याचा धोका होता ही बाबही आता समोर आली आहे. म्हणजे पाहताक्षणी जो धोका लक्षात यायला हवा होता, त्याकडे कोणाचेच लक्ष कसे गेले नाही हा मुद्दा महत्त्वाचा आहे. जिथे छोट्या जीवांना उपचारासाठी ठेवले गेले आहे तिथे असल्या धोक्याकडे दुर्लक्ष करणे हा हत्या करण्याइतकाच गंभीर मामला मानला गेला पाहिजे आणि संबंधितांवर तद्नुषंगिक कलमान्वये कारवाई झाली पाहिजे. आणखी एक गंभीर बाब म्हणजे या अर्भक उपचार केंद्रात योग्य डॉक्टरचीही नियुक्ती नव्हती. अग्निशमन दलाकडून या केंद्राला एनओसीही मिळालेली नव्हती. म्हणजे एकुणातच हा सारा अक्षम्य गलथानपणाचाच मामला आहे.

दिल्लीत हॉस्पिटलांना आग लागण्याचा हा पहिलाच प्रकार आहे असे नव्हे तर, यापूर्वीही दिल्लीत असे अनेक प्रकार घडले आहेत. मागील काही घटनांचा मागोवा घेतला तर असे लक्षात येते काही दिल्लीत गेल्या दोन वर्षांत तब्बल ६६ रुग्णालयांना आगी लागल्या आहेत. इतक्या सार्या घटना अल्पावधीत घडल्यानंतर दिल्ली परिसरातील सर्वच रुग्णालयांचे सेफ्टी ऑडिट नव्याने करण्याची गरज आहे. दिल्लीतील काही अधिकार्यांनी या घटनेच्या अनुषंगाने ज्या मुलाखती विविध माध्यमांना दिल्या आहेत, त्यात त्यांनी म्हटले आहे की रुग्णालय इमारतींमध्ये बांधकाम नियमावलीनुसार इमर्जन्सी एक्झिट गेट असणे अनिवार्य आहे. दिल्लीतील अनेक रुग्णालयांच्या इमारतींमध्ये ही तरतूद केली गेलेली नाही. ज्या शिशु अर्भक केंद्रात ही आग लागली तिथेही अशी तरतूद नव्हती. त्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना शिड्या लावून खिडक्या तोडून आतील अर्भके बाहेर काढावी लागली आहेत.

किमान सुरक्षा तरतुदी केल्या गेल्या नसतील, तर रुग्णालयांच्या इमारतींना परवानगीच कशी दिली जाते, असा सवाल आहे. हा केवळ दिल्लीचाच विषय नाही तर संपूर्ण देशातील सर्वच महापालिकांच्या हद्दीतील इमारतींचा विषय आहे. साध्या रेस्टॉरंटला अनुमती देताना तिथे येणार्या ग्राहकांसाठी पुरेशी पार्किंग व्यवस्था आहे की नाही याची जागेवर जाऊन पाहणी करूनच मग त्या रेस्टॉरंट्सना परवानगी दिली जाते. सुरक्षाविषयक अशा सर्व नियमावली सगळ्याच बाबतीत लागू आहेत, पण प्रश्न फक्त त्याच्या अंमलबजावणीचा असतो. त्याकडे दुर्लक्ष होण्यामागे भ्रष्ट मानसिकता कारणीभूत असते, ही सार्वत्रिक समस्या आहे. त्यावर एका रात्रीत उपाय होणे शक्य नाही हे सगळेच जाणून आहेत, पण निदान रुग्णालयांच्या बाबतीत मात्र असला गलथानपणा होता कामा नये यासाठी कठोर उपाययोजना करणे अशक्य नाही आणि एका दिवसांत हे उपाय होऊ शकतात. मुळात सुरक्षाविषयक नियमावली खूप आधीपासूनच सर्वत्र लागू आहे, प्रश्न केवळ त्याच्या तंतोतंत अंमलबजावणीचा आहे. दिल्लीत काल घडलेल्या या भीषण घटनेच्या पार्श्वभूमीवर आता अशा तातडीच्या निर्णयाची गरज आहे.

# उच्च रक्तदाबाचे आव्हान

अलीकडील काळात हायपरटेन्शन किंवा उच्च रक्तदाबाने त्रस्त असणार्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पूर्वी रक्तदाबाची पातळी ८० आणि १२० ही सामान्य मानली जात होती; पण अमेरिकी हार्ट असोसिएशनने यात बदल करत ही मर्यादा ७० आणि ११० अशी निश्चित केली आहे. ॲथेलिट किंवा चांगली जीवनशैली अंगीकारणार्या लोकांचा रक्तदाब हा ६० आणि १०० असल्याचे निदर्शनास आले आहे. ही मर्यादादेखील सामान्यच मानायला हवी; परंतु ती ओलांडल्यास तपासणीची गरज भासते. हायपरटेन्शन हा काही आजार नाही; परंतु काही आजारांचे लक्षण आहे, हे समजून घेतले पाहिजे.आपल्या रक्तवाहिन्यांत रक्ताचा प्रवाह सुरळीत ठेवण्यातासाठी एक सामान्य दबाव असणे गरजेचे असते; पण गरजेपेक्षा अधिक ताण किंवा दबाव राहिल्यास त्याला उच्च रक्तदाब किंवा हायपरटेन्शन असे म्हणता येईल. साधारणपणे उच्च रक्तदाबाला एखाद्या आजारासारखे मानले जाते आणि डॉक्टरदेखील त्यानुसार उपचार करताना दिसतात. या ताणतणावाचे आकलन करण्यासाठी रक्तदाबाला दोन गटांत विभागले पाहिजे. प्रायमरी हायपरटेन्शन आणि सेकंडरी हायपरटेन्शन. भारतात बहुतांश नागरिकांना प्रायमरी हायपरटेन्शन आहे. डॉक्टरनी एखाद्या व्यक्तीचा रक्तदाब तपासला, तर तो अधिक दिसतो आणि त्यामागे विशेष कारणही नसते. याला आपण 'इन्सेशियल हायपरटेन्शन' असे म्हटले जाते. सेकंडरी हायपरटेन्शन म्हणजे मूत्रपिंड विकार, हृदयविकार, ट्यूमरचा शोध आदी. या श्रेणीतील नागरिक दुकानदारांकडून विशेषत: पेनकिलर खरेदी करत असतात.

अनेक औषधांमध्येही रक्तदाब वाढविणारे घटक असतात. जेवणात मिठाचे अधिक प्रमाण असणेदेखील सेकंडरी हायपरटेन्शनचे कारण राहू शकते. साधारणपणे आपली जीवनशैली चांगली नसली तरी हृदय मात्र चांगले काम करत असते; मात्र काही कारणांमुळे रक्तवाहिन्या आकुंचित पावतात आणि रक्तदाब वाढतो. आधुनिक उपचार पद्धतीत त्यावर उपाय असून औषध देत रक्त पातळ केले जाते आणि हायपरटेन्शन कमी केले जाते. अशा स्थितीत एड्रिनलीन हे शरीराच्या अन्य भागात मेंदू, हृदय, मूत्रपिंड आदींवर परिणाम करते.अर्थात, रक्तवाहिन्या आकुंचित का झाल्या, हे पाहिले पाहिजे. एखादी व्यक्ती लठ्ठ असेल तर तिला रक्तदाबाची तक्रार राहू शकते. भरपूर कॅलरीयुक्त आहार, पिझ्झा, बर्गर, प्रोसेस्ड फूड, चरबीयुक्त आहार, मीठ, साखरेचे अतिसेवनदेखील रक्तदाबाला निमंत्रण देऊ शकते. अशा व्यक्तींना हृदयविकार, मधुमेह, कर्करोगासारखे आजार होऊ शकतात. लठ्ठपणा वाढल्याने अधिक इन्सुलिन तयार होऊ लागते. इन्सुलिनचे काम ग्लुकोज कमी करण्याचे असते. आपण यास वारंवार वाढवत असाल तर तो शरीरात सोडियम आणि पाणी जमा करेल आणि परिणामी हायपरटेन्शनला ते कारणीभूत राहू शकते.साठ ते ऐंशी किलो वजन असणार्या व्यक्तीने दररोज सहा ग्रॅम मिठाचे सेवन करायला हवे. खूप साखर खाणेदेखील इन्सुलिन वाढवणारे ठरते आणि त्यामुळे रक्तदाबही वाढतो. या सवयीने लोकांची जीवनशैली सुस्त होते. त्यामुळे आपण प्रत्येकाने आहाराची सूत्रे सांभाळतानाच अर्धा तास तरी व्यायाम करायला हवा. या व्यायामाचा अर्थ जीम नाही. सामान्य व्यायाम, जसे फिरणे, पळणे, पोहणे, सायकल चालविणे आदी. त्यामुळे उच्च रक्तदाब थांबवता येणे शक्य आहे. दररोज दहा ते बारा हजार पावले चालले, तर केवळ रक्तदाबच नाही, तर अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो.तणाव हा हायपरटेन्शनचे एक मोठे कारण आहे. शहरातील आयुष्य धावपळीचे आहे. त्यात ताणतणाव असणे स्वाभाविक आहे. यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे; कारण तणावामुळे एड्रिनलिनबरोबरच आणखी एक हार्मोन तयार होतो आणि तो सोडियम आणि पाणी जमा करत लठ्ठपणाला निमंत्रण देतो. याला अनियमित आहार आणि सुस्तपणा या दोन्ही गोष्टी जोडल्या पाहिजेत. शरीरातील तणाव हा खूपच चिंताजनक असण्याचे एक कारण राहते. शिवाय मद्यपान आणि धूम्रपानदेखील उच्च रक्तदाबाचे कारण आहे. उच्च रक्तदाब हा एकप्रकारे अनियोजित जीवनशैलीचे देणे आहे. जसजशी निष्काळजीपणाची जीवनशैली वाढेल, तसतशी हायपरटेन्शनची समस्या आणखी गंभीर होईल आणि आजारपणाचे ओझे वाढत राहील. कधी काळी मातीच्या तसेच लोखंडाच्या, पितळेच्या भांड्यात स्वयंपाक केला जायचा. आता पॉलिश केलेल्या नॉनस्टिक भांड्यांचे प्रस्थ वाढले आहे. अशा भांड्यांतील काही तत्त्वे मेटाबॉलिक सिंड्रोमला कारणीभूत ठरतात. या सिंड्रोममध्ये हायपरटेन्शनबरोबरच मधुमेह होण्यास हातभार लावतो. प्लास्टिकमध्ये पॅक केलेल्या गरम भोजनाचे सेवनदेखील धोकादायक आहे आणि ही स्थिती फास्टफूडसारखीच आहे. बाजारात मिळणार्या बहुतांश खाद्यपदार्थांना सुरक्षित ठेवण्यासाठी त्यात मिठाचा अधिक वापर केला जातो. मिठाचा प्रभाव कमी करण्यासाठी साखर टाकली जाते. साखरेची चटक ही एक प्रकारे धूम्रपानाची सवय लागण्यासारखीच आहे.

## मूल बोलताना अडखळतेय?, मुलांमधील तोतरेपणा, लक्षणे अन् उपचार



बर्याच वेळा आपल्या घरातील, आजूबाजूची लहान मुले छोटे-छोटे शब्द बोलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. नुकतीच बोलायला शिकलेली मुले त्यांच्या बोबड्या आवाजात एक-दोन शब्द म्हणायला सुरुवात करतात, ते ऐकायला खूपच गोड वाटते. त्यापैकी काही मुले सुरुवातीची काही वर्षे बोबडे बोलतात. त्यानंतर हळूहळू त्यांचे उच्चार आणि भाषा स्पष्ट व्हायला लागते; मात्र काही वेळेस काही मुलांना आपण सांगितलेली गोष्ट समजत नाही आणि त्यांची भाषा व उच्चार स्पष्ट नसतात, तेव्हा मात्र समस्या निर्माण होऊ शकतात.

लहान मूल बोलताना अडखळणे किंवा तोतरेपणा ही लहान मुलांमधील एक सामान्य समस्या आहे. हा विकार मुलांच्या भाषाशैलीवर परिणाम करतो आणि त्यांच्या विकासात अडथळा निर्माण करतो. यामुळे मूल योग्यरीत्या संवाद साधण्यास आणि त्याच्या भावना किंवा मत व्यक्त करण्यास सक्षम नसते. संवाद कौशल्यात येणार्या अडथळ्यांमुळे मूल कोणत्याही सामाजिक किंवा शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होण्यात रस दाखवत नाही. अशी मुले अनेकदा इतर मुलांशी संभाषण टाळण्याचा प्रयत्न करतात तसेच ते समाजात वावरण्यास संकोच बाळगतात.

लक्षणे

पुन्हा-पुन्हा तेच बोलणे, अर्धवट वाक्य तयार करणे, तुटक शब्द, अवघड शब्दांचा उच्चार टाळणे, मूठ दाबणे, बोलताना जास्त डोळे मिचकावणे, नैराश्य येणे किंवा संकोच बाळगणे. बर्याचदा कौटुंबिक इतिहास, स्ट्रोक किंवा मेंदूला दुखापत, ठरावीक औषधे आणि उच्च पातळीचा तणाव यामुळेदेखील संवादासंबंधी विकार आढळून येऊ शकतो. यासाठी वेळीच उपचार करणे आवश्यक ठरते.

निदान महत्त्वाचे

वेळीच उपचार केल्याने मुलाला आत्मविश्वास मिळतो आणि सार्वजनिक ठिकाणी निर्भयपणे बोलता येते किंवा कोणत्याही अडचणीशिवाय संवाद साधता येतो. याकडे लक्ष दिले नाही तर नैराश्य येणे, मानसिकरीत्या दडपण येणे तसेच नैराश्याचा सामना करावा लागतो.

उपचार

संवाद साधताना अडखळल्यामुळे मुलाच्या विकासात अडथळे येत असल्यास पालकांनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. संवाद कौशल्य वाढवण्यासाठी स्पीच थेरपी पर्याय निवडणे योग्य ठरते. कॉग्निटिव्ह बिहेवियरल थेरपीदेखील मुलांना तणावपूर्ण परिस्थिती हाताळण्यासाठी, त्यांची क्षमता वाढवण्यासाठी, तोतरेपणाची समस्या कमी करण्यास फायदेशीर ठरते. कॉग्निटिव्ह बिहेवियरल थेरपी ही आपल्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये बदल घडवून आणून मानसिक आजारांवर उपचार करण्यासठी अतिशय उपयुक्त आहे.

मुलांमधील तोतरेपणा

ही समस्या असलेल्या व्यक्ती वाक्याच्या सुरुवातीला अडखळतात, त्यांचे शब्द खेचले जातात किंवा पुन्हा पुन्हा उच्चारले जातात अथवा पहिलाच शब्द फुटत नाही, असे सर्वसाधारण दिसून येते. काहीजणांना बोलताना हाताची मूठ आवळण्याची सवय असते, तर काहींना पाय जमिनीवर दाबण्याची सवय असते. स्पीच थेरपीने अशा मुलांना जर एखादा ठरावीक शब्द म्हणण्यात किंवा त्याचा उच्चार करण्यात अडचण येत असेल, तर तो शब्द अर्धा-अर्धा तोडून त्याचा उच्चार करणे, तसेच तो वाचायला शिकवले जाते. हळूहळू या मुलांमधील उच्चार स्पष्ट होऊ लागतात.

# बाजार लाल रंगात बंद, निफ्टी २२,९०० च्या खाली

शेअर बाजारात अस्थिरता वाढल्याने सेन्सेक्स आणि निफ्टी मंगळवारी (दि. २८) घसरले. सेन्सेक्स २२० अंकांनी घसरून ७५,१७० वर बंद झाला. तर एनएसई निफ्टी ४४ अंकांच्या किरकोळ घसरणीसह २२,८८८ च्या सपाट पातळीवर स्थिरावला.




क्षेत्रीय आघाडीवर ऑईल आणि गॅस, कॅपिटल गुड्स, टेलिकॉम, झक्ष बँक, पॉवर आणि रियल्टी निर्देशांक १ ते १.५ टक्क्यांनी खाली आले. लोकसभा निवडणूक निकालापूर्वीच्या अस्वस्थ वातावरणात बाजारात घसरण झाली असल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

बीएसई मिडकॅप- स्मॉलकॅपवर विक्रीचा दबाव


निफ्टी फार्मा वगळता सर्व क्षेत्रीय निर्देशांकांनी आज लाल रंगात व्यवहार केला. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅपवर विक्रीचा दबाव राहिला. बीएसई मिडकॅप ०.६ टक्क्यांनी आणि बीएसई स्मॉलकॅप जवळपास १ टक्क्यांनी घसरला.

कोणते घसरले, कोणते वाढले? सेन्सेक्सवर पॉवर ग्रिड, टेक महिंद्रा, एनटीपीसी, टाटा मोटर्स, भारती एअरटेल, मारुती, रिलायन्स या शेअर्समध्ये घसरण झाली. तर एशियन पेंट्स, हिंदुस्तान युनिलिव्हर, जेएसडब्ल्यू स्टील, विप्रो, एम अँड एम हे शेअर्स तेजीत राहिले.

एनएसई निफ्टीवर अदानी पोर्ट्स, पॉवर ग्रिड, कोल इंडिया, बीपीसीएल, अदानी एंटरप्रायजेस हे शेअर्स १ ते २ टक्क्यांनी घसरले. तर डिव्हिस लॅब, एसबीआय लाईफ, एचडीएफसी लाईफ, ग्रासीम, हिरो मोटोकॉर्प हे २ ते ३ टक्क्यांनी वाढले.भयसूचकांक पुन्हा वाढला शेअर बाजाराचा भयसूचकांक खपवळर ४ टक्क्यांनी वाढून २४ वर पोहोचला आहे. लोकसभा निवडणुकीच्या सुरुवातीच्या टप्प्यात अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाल्यामुळे गेल्या एका महिन्यात हा निर्देशांक आधीच १२२ टक्क्यांनी वाढला आहे. शेअर बाजाराचा चढ-उतार दर्शवणारा (व्हीक्स) राष्ट्रीय सूचकांक निफ्टीमधील वायदा बाजार व्यवहाराच्या ३० दिवसांच्या अपेक्षित चढ-उताराशी निगडित आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. यामागे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय

# जाणून घ्या ब्रेन ट्यूमर

ट्यूमर मेंदूच्या विविध पेशींमध्ये असतात ज्यामुळे डोकेदुखी, झटके येणे, शारीरिक संतुलन गमावणे, दृष्टिदोष आणि ऐकू येण्याच्या क्षमतेत बदल, स्मृतीसंबंधी समस्या, शरीराच्या एका भागात किंवा एका बाजूला अशक्तपणा किंवा अर्धांगवायू, चक्कर येणे, बोलताना अडखळणे, चेहर्याचा सुन्नपणा अशी ब्रेन ट्यूमरचे विविध लक्षणे दिसून येतात.



ब्रेन ट्यूमरचा एक सामान्य प्रकार म्हणजे मेनिन्जिओमा, जो मेंदू आणि पाठीच्या कण्याच्या सभोवतालच्या संरक्षणात्मक स्तर असलेल्या मेनिन्जेसपासून उद्भवतो. मेनिन्जिओमा सामान्यत: हळू वाढणारे आणि सहसा सौम्य असतात. ट्यूमरचा आणखी एक प्रकार म्हणजे ग्लिओमा, जो मेंदूतील चेतापेशींना आधार देणार्या ग्लिअल पेशींमुळे उद्भवतो. ग्लिओमाचे वर्गीकरण उपप्रकार जसे की, स्ट्रोसाईटोमा, ऑलिगोडेंड्रोग्लिओमास आणि एपेन्डीमोमासमध्ये केले जाऊ शकते.ब्रेन ट्यूमरमागील नेमके कारण अनेकदा अज्ञात आहे. किरणोत्सर्गाच्या संपर्कात येणे किंवा काही आनुवांशिक परिस्थिती यासारखे घटक विकसित होण्याची शक्यता वाढवतात.ब्रेन ट्यूमरचे निदान एमआरआय, सीटी स्कॅन आणि बायोप्सीद्वारे केले जाऊ शकते. ट्यूमरचे स्थान, वय, ट्यूमरचा प्रकार आणि आकार यावर आधारित उपचार केले जातात. उपचार ट्यूमर काढून टाकण्यासाठी आणि मेंदूला होणारे नुकसान कमी करण्यासाठी मेंदूच्या शस्त्रक्रियेच्या (क्रॅनिओटॉमी) स्वरूपात उपचार केले जातील. शंटस्, रेडिएशन थेरपी, इम्युनोथेरपी, केमोथेरपी, रेडिओसर्जरी आणि टार्गेटेड थेरपीदेखील ब्रेन ट्यूमर असलेल्यांसाठी वरदान ठरू शकते.

# हाडांच्या बळकटीसाठी 'या' पदार्थांचा आहारात समावेश हवा

आरोग्य चांगले राखण्यासाठी इतर गोष्टींबरोबरच शरीरातील हाडांची देखभालही तेवढीच महत्त्वाची आहे. उत्तम आरोग्यासाठी बळकट हाडे आणि ती जोडणारे सांधे सक्षम असायला हवेत. या दोन्ही गोष्टी मजबूत ठेवायच्या असतील तर त्यासाठी आहार, व्यायाम इत्यादींचे अनेक मार्ग आहेत. ते समजावून घेतले तर आपल्यालाही सक्षम हाडे आणि त्यांचे सांधे लाभून उत्तम आरोग्याची प्राप्ती होईल. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या आहाराकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

हाडांच्या सक्षमतेसाठी त्यांना मिळणारे कॅल्शियम अधिक महत्त्वाचे ठरते. त्यासाठी कॅल्शियम डी लाभेल असा आहार असायला हवा. ते मिळण्यासाठी दुग्धोत्पादने, मासे, थंड दूध इत्यादींचा आहारात समावेश करायला हवा. शेंगदाणे किंवा तत्सम पदार्थ हे हाडांना बळकटी देणारे चांगले खाद्य आहे. त्यापासून हाडांना कॅल्शियमची प्राप्ती होते. शेंगदाण्यांबरोबरच सूर्यफुलांचे बी, बदाम यापासूनही हाडांना कॅल्शियम लाभते. त्यामुळे त्याचाही आपल्या आहारात समावेश करायला हवा.

कॅल्शियम 'डी'बरोबरच कॅल्शियम 'के' हेदेखील हाडांच्या बळकटीसाठी महत्त्वाचे ठरते. यामुळे हाडांची रचनाही चांगली राहते. हाडांची क्षमता वाढण्यासही मदत होते. याखेरीज हिरव्या पालेभाज्यांचा आहारात भरपूर समावेश असायला हवा.



हाडांच्या सक्षमतेसाठी शारीरिकदृष्ट्या नेहमी कार्यरत असणे गरजेचे आहे. प्रौढांनी दिवसातून कमीत कमी अर्धा तास वजन उचलण्याचा व्यायाम करायला हवा. किशोरवयीनांनी तो एक तास करायला हरकत नाही. व्यायामात स्टेप ॲक्रोबिकऐवजी पोहणे, सायकलिंगसारखे व्यायाम करायला हवेत. बळकट स्नायूंमुळे सांधे सक्षम राहण्यास मदत होते. वजन उचलण्याचा व्यायाय स्नायू सक्षम ठेवण्यासाठी मदतीचा ठरतो.

व्यायाम करताना आपली उभे किंवा बसण्याची स्थिती (पोश्चर) योग्य असायला हवी. उभे राहताना नेहमी ताठ उभे राहायला हवे. यामुळे मानेपासून गुडघ्यापर्यंतच्या सांध्यांना होणार्या बाधा टाळण्यास मदत होते. हाडांच्या आरोग्यासाठी धूम्रपान, मद्यपान, अमली पदार्थांचे सेवन टाळायला हवे; अन्यथा हाडे खिळखिळी होऊन ती तुटण्याची शक्यता वाढते.

हाडांना कोणत्याही प्रकारचा त्रास जाणवत असेल तर त्वरित आपल्या डॉक्टरची प्रामुख्याने अस्थिरोगतज्ज्ञांची भेट घेऊन त्यांना त्याविषयी सांगितले पाहिजे. कोणत्याही नवीन पदार्थांचा आहारात समावेश करायचा असेल तर तो करण्यापूर्वीही डॉक्टरांचा त्याविषयी सल्ला घ्यायला हवा. हाडांमध्ये वेदना होऊन वजन कमी झाल्यासारखे वाटत असेल तरी डॉक्टरांची भेट घ्यायला हवी. यामुळे भविष्यात होणारे आर्थ्रायटीससारखे आजार टाळण्यासाठी मदत होते.

गुडघे, कंबर, नितंब यांच्या हाडांना बाधा झाली असेल होणार्या वेदना नष्ट करण्यासाठी सर्जरीचा पर्याय उपलब्ध आहे. अशा सर्जरीनंतर रुग्ण नियमित जीवनशैली जगत आहेत. या शस्त्रक्रियांमध्ये आता अत्याधुनिक तंत्रज्ञानही उपलब्ध झाले आहे.

बाजारात मिळणार्या सप्लिमेंटस्च्या आाधारे हाडांची बळकटी वाढवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आहारातून कॅल्शियम, लोह आणि अन्य जीवनसत्त्वे कशी शरीराला मिळतील, याकडे अधिक लक्ष द्या आणि व्यायामाला अंतर देऊ नका.

# रक्ताची गुठळी होणे म्हणजे काय? जाणून घ्या लक्षणे, उपचार

आपल्या शरीरात रक्त गोठणे अथवा त्याची गुठळी बनणे आणि पुन्हा ती विरघळणे ही प्रक्रिया सहज रूपात सुरू असते. रक्ताची गुठळी निसर्गतः बनण्याच्या या वैशिष्ट्यामुळेच जखम झाल्यानंतर रक्त वाहणे आपोआप थांबते. जखम बरी झाल्यानंतर या गुठळ्या विरघळूनही जातात; परंतु ज्यावेळी या प्रक्रियेमध्ये अडचण निर्माण होते, तेव्हा रक्ताची गुठळी तशीच राहते. दीर्घकाळ यावर उपचार न झाल्यास ते गंभीर रोगाचे रूप धारण करू शकते. ब्लड क्लॉटिंग अर्थात रक्ताची गुठळी होणे म्हणजे काय, ते कसे होते, त्याची निर्मिती आणि त्यापासून बचाव कसा करता येऊ शकतो, याबाबत जाणून घेऊ.आपल्या शरीरात रक्तवाहिन्यांद्वारे निरंतनपणाने रक्त वाहत असते. सतत वाहणारे हे रक्त हृदयापर्यंत जाते आणि पंपिंगद्वारे शुद्ध झाल्यानंतर शरीराच्या अन्य मुख्य अवयवांकडे आणि पेशींपर्यंत पोहोचते. हेच रक्त पुन्हा धमन्यांद्वारे हृदयाकडे पुन्हा पाठवले जाते. हृदयापर्यंत पाठविण्याच्या या प्रक्रियेत धमन्या आकुंचन पावतात; कारण शरीराच्या पेशी रक्त परत पाठवण्यासाठी ताकद लावतात. याच वाहत्या रक्तामध्ये कधी-कधी क्लॉट म्हणजेच गुठळी बनते. ही रक्ताची गुठळी आपोआपच बनते. सामान्य प्रक्रियेमध्ये ही गुठळी क्षतीग्रस्त नलिकांची दुरुस्ती करण्याचे कामदेखील करते. असे झाले नाही तर जखम झाल्यानंतर शरीरातील रक्ताचे वाहणे रोखणे अवघड होऊन बसेल. रक्तातील प्लाझ्मामध्ये प्लेटलेटस् आणि प्रोटिन्स असतात. जखम झालेल्या ठिकाणी ते रक्ताच्या गुठळ्या निर्माण करून रक्त वाहणे रोखतात. सामान्यपणे जखम बरी झाल्यानंतर रक्ताची गुठळी आपोआप विरघळते; पण रक्ताची गुठळी न विरघळणे आणि दीर्घकाळापर्यंत तशीच राहणे आरोग्यासाठी धोकादायक असते. त्यासाठी तपासणी आणि उपचाराची गरज असते. उपचार न करता दीर्घकाळ तसेच राहिल्यास रक्ताच्या गुठळ्या धमन्या अथवा नसांमध्ये जातात आणि शरीरातील कुठल्याही भागात म्हणजे डोळे, हृदय, मेंदू, फुफ्फुसे, किडनी इत्यादी ठिकाणी जाऊन त्या अवयवांचे काम बाधित करतात.डोळे रक्ताच्या गुठळ्या शरीराच्या कुठल्याही भागात जाऊ शकतात. ही गुठळी रक्तप्रवाहाद्वारे डोळ्यामध्ये पोहोचू शकते. ही गुठळी आपल्याला दिसेल की नाही, हे ती डोळ्यातील कुठल्या भागात आहे, यावर अवलंबून असते. यामुळे डोळ्यांमध्ये



वेदना आणि नजर अस्पष्ट होणे ही लक्षणे दिसतात. सामान्य डोळ्यांच्या तुलनेत प्रभावित डोळ्याची पुतळी आकाराने वेगळी दिसते.हायफेमासारख्या स्थितीमध्ये कॉर्निया अथवा पुतळीमध्ये रक्त येते. डोळ्यामध्ये रक्ताची गुठळी बघून बहुतेक वेळा वाटते की, डोळ्यात जखम झाली आहे. काही वेळा या गुठळ्या आपोआपच बर्या होतात; पण तरीही याबाबत वेळीच नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. मेंदू मेंदूमध्ये रक्ताची गुठळी असल्यास या गुठळीचा परिणाम जोपर्यंत शारीरिक क्रिया, हालचालींवर दिसत नाही, तोपर्यंत त्याची चटकन माहिती होत नाही. या संकेतांमध्ये संभावित पक्षाघात, बोलण्यास व समजण्यास अडचण, चक्कर येणे इत्यादीचा समावेश होतो. अनेकदा उलटीदेखील येऊ लागते.

# पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी बौद्ध संघटनांनी उठाव केला पाहिजे – प्रा. विजय मोहिते

गुहागर :– भारत देशावर आजवर अनेकांची आक्रमण झाली आणि देश गुलामीच्या बेडीमध्ये अडकला होता असे सर्वत्र सांगितले जाते व शाळाशाळांतून शिकवले ही जात परंतु या देशात १७०० वर्षे चक्रवर्ती सम्राट अशोक ते सातवाहना पर्यंत अनेक महान बौद्ध राजे होऊन गेले ज्यांनी भारत देश सुजलाम सुफलाम होण्यासाठी दिवसेंरात्र परिश्रम घेतले व बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार केला त्याचमुळे भारत देशातून सोन्याचा धूर निघत होता हे कधीच सांगितले जात नाही व याच बौद्ध शासकांनी तीस हुन अधिक विद्यापीठे निर्माण केली होती त्यामुळे जगातील कानाकोपऱ्यातुन अनेक विद्वान विद्यार्थी याठिकाणी येऊन विद्यासंपदान करीत होते, तसेच या बौद्ध शासकांनी अनेक शिलालेख, स्तूप, बौद्धलेणी कोरल्या या कार्यकरता दान देणाऱ्या ज्या व्यक्ती होत्या त्या तत्कालीन महार समाजाच्या होत्या त्यांच्या नावाचा उल्लेख आज पालीभाषेत, मोडीभाषेत आढळतात, आज बुद्धाला काल्पनिक देवांचा अवतार म्हणून सादर केलं जात असताना या देशात कोणत्याही काल्पनिक देवीदेवांची जन्म मृत्यू नोंदणी नाही परंतु तथागत गौतम बुद्धांच्या जन्म मृत्यूची नोंद मात्र उपलब्ध आहे, आज अनेक ठिकाणी पालीभाषेतील शिलालेख, अवशेष सापडत आहेत त्यामुळे पाली ही सर्वात जुनी व प्रमाणित भाषा असल्याने पालीभाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी बौद्ध संघटनांनी एकत्र येऊन उठाव केला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. विजय मोहिते यांनी केले. बौद्धजन सहकारी संघ ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी, गाव व मुंबई शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ वा तसेच तथागत गौतम बुद्धांचा २५६८ वा जयंती महोत्सव संयुक्तरित्या कार्याध्यक्ष विश्वनाथ बाबू कदम यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, जानवळे, शृंगारतळी ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रथम सत्रात सदर प्रसंगी पूज्य भन्ते विमल बोधी यांनी धार्मिक पूजापाठ करून सर्वांना धम्मदेसना देत आपले मौलिक विचार मांडून मार्गदर्शन केले, सदर कार्यास त्यांना सहायक म्हणून संस्कार समिती अध्यक्ष शशिकांत जाधव, सचिव सुभाष जाधव आणि त्यांचे सहकारी कार्यकारी मंडळ व श्रामनेर यांनी ही धार्मिक विधीत सहभाग घेतला होता, सदर प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्थानिक विभागीय सरचिटणीस महेंद्र महादेव मोहिते यांनी केले तसेच मुंबईचे कार्याध्यक्ष दीपक मोहिते यांनी प्रास्ताविक सादर करताना गेल्या ५ वर्षाच्या कालावधीत बौद्धजन सहकारी संघाच्या वतीने राबविण्यात आलेले श्रामनेर शिबिर, वर्षावास शिबिर आदी उपक्रम तसेच चक्रीवादळा सारखी नैसर्गिक आपत्ती, कोरोना महामारी यावर मदत व बचावात्मक केलेली कार्य यांचा आढावा घेत भविष्यात होणाऱ्या पतपेढी, घटनात्मक फेरफार व बदल, मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आखलेले उपक्रम आदी उपक्रमांची माहिती दिली. तद्नंतर अध्यक्ष सुनील जाधव व दिपक मोहिते यांनी पाहुण्यांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. द्वितीय सत्रात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवीधर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पुस्तके देऊन तालुक्याच्या वतीने त्यांना सन्मानित करण्यात आले. सदर प्रसंगी



स्मृती जाधव, असित संतोष सुर्वे आदी मुलांनी दमदार आवाजात आपले विचार व्यक्त करीत सभागृहास मंत्रमुग्ध करून सोडले. तसेच तालुका संघाचे विश्वस्त राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, के. सी. जाधव, अध्यक्ष सुनील जाधव, प्रा. अजय मोहिते आदी मान्यवरांनीही शुभेच्छापर आपले विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास तालुका संघाचे आजी माजी कार्यकर्ते, विभाग कमिटी, विभाग अधिकारी, मध्यवर्ती कमिटी, शाखांचे कार्यकर्ते उपासक मोठया संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाच्या नियोजित रुपरेषेनुसार भव्यदिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते परंतु ऐनवेळी पावसाची चिन्हे दिसू लागल्याने सदर मिरवणूक रद्द करण्यात आली, संध्याकाळच्या शेवटच्या सत्रात तालुक्यातील हौशी कलावंताचा नृत्याविष्कार, गितगायन, मुक्त कलाविष्कार कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या आजी माजी कार्यकर्ते, विभाग अधिकारी, शाखा पदाधिकारी, मध्यवर्ती कमिटी, महिला मंडळ या सर्वांचे आभार मानून संघाचे कार्याध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वनाथ कदम यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# वैशाखी बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी,



किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट शहरातील सिद्धार्थ नगरातील जेतवन बुद्ध विहारात आज रोजी वैशाखी बौद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अर्चना स्थुल यांनी समयोचित मार्गदर्शन केले. प्रारंभी पंचरंगी ध्वजाचे रोहण झाल्यानंतर सामुहिक त्रिशरण पंचशिले सह बुद्ध, धम्म व संघ वंदना प्रा. सुबोध सर्पे यांनी घेतली. उपस्थित बांधवांना विशाखा महिला मंडळाच्या वतीने खिर दानानंतर नंयातर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी बौध्द उपासक, उपासिका यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. यात फुले-आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गौतम पाटील, अँड. मिलिंद सर्पे, शोभा भवरे, मैनाबाई पाटील, राजेश पाटील, सूर्यकांता सर्पे, सुधाबाई परेकार, राहीबाई पाटील, कमलबाई भरणे, सीमा पाटील, शशिकला कावळे, माला नगारे, योजना पाटील, मेघा सर्पे, आकाश आढळते, अँड. सम्राट सर्पे, ललिता मुनेश्वर, सम्यक ,यांचा समावेश होता. यात महिला व बालकांचाही लक्षणीय सहभाग होता.

# मारेगाव (खा) येथे पाण्यात बुडून तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू,

किनवट. प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट तालुक्यातील मारेगाव (खा) येथे पाण्यात बुडून तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली. मारेगाव येथील स्वाती देविदास कांबळे (१२), पायल देविदास कांबळे (१६), ममता सुरेश विविधकर (१९) ह्या मुली जवळच असलेल्या पैनगंगा नदीच्या शेजारील नाल्यामध्ये पाय घसरून पडल्यामुळे एकीला वाचविण्यासाठी दुसरी मुलगी गेली असता पाण्यात बुडत असताना तीनही मुलींनी एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात त्या तिघेही पाण्यात बुडाल्या. या घटनेची माहिती मिळताच किनवट पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी धाव घेतली. या तीनही मुलांना पाण्याबाहेर काढून पंचनामा केला. या तीनही मुलींना उत्तरिय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे आणण्यात आले आहे. उपजिल्हा रुग्णालयात



शवविच्छेदनासाठी आणण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मामीडवार हे करीत आहेत.

# जागतिक महिला दिनानिमित्त राज्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

पुणे शिवाजीनगर येथील बालगंधर्व रंगमंदिरात जागतिक महिला दिनानिमित्त सृष्टी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आंबेजोगाई यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय अशी भरीव कामगिरी करणाऱ्या महिलांचा राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर व सिंधुताई सपकाळ अशा राज्यस्तरीय पुरस्कार २०२४ साठी एकूण ९३ महिलांना सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा. श्रीमती अनिता लक्ष्मण काळे, (राज्यकर्त्या अध्यक्ष मराठा समन्वय परिषद महाराष्ट्र राज्य ), प्रमुख पाहुणे मा. डॉक्टर स्मिता बारावकर (मॉडेल) केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य मुंबई), मा. सौ भावना घाणेकर (प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस), प्रमुख उपस्थिती मा. सौ संगीता शिवाजी शिंदे (अध्यक्ष तेजस्विनी महिला विकास मंडळ सातारा), मा. सौ विद्याताई गडाख (जिजाऊ ब्रिगेड उपाध्यक्ष), मा. सौ संगीता कृष्णादेव गुरव (उद्योजिका), मा. सौ अनुराधा रवींद्र सरवदे (पत्रकार), मा. सौ मीनाक्षी विकास डोंगरे (अध्यक्ष), सौ माधुरी प्रवीण साळवे (उपाध्यक्ष), मा.भारती अशोक एकलारे (सचिव), अशा विविध क्षेत्रातील उत्तुंग असे कामगिरी करणाऱ्या मान्यवरांच्या हास्य पुरस्काराचे वितरण करण्यात आले.



यांप्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी-साहित्यिक व विचारवंत मा श्री उत्तम दासू तरकसे असरडोहकर यांचा सन्मान करण्यात आला. सदर सन्मानाची कृत्यग्नता म्हणून उत्तम तरकसे यांनी उपस्थित मान्यवरांना त्यांच्या शांईची नोंद या काव्यसंग्रहा सन्मानपूर्वक देण्यात आला व उत्तम तरकसे यांनी सर्व पुरस्कारथींचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सौ अलका जोशी यांनी खूप सुंदर केले तसेच मा. श्री विकास डोंगरे व त्यांचे सर्व सहकार्य यांनी खूपच मेहनत घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली उत्सव सोहळ्यास पुरस्कारथी व त्यांचे मित्र परिवाराने बालगंधर्व रंगमंदिर अगदी फुलून गेले होते कार्यक्रमाच्या शेवटी विकास डोंगरे यांनी सर्व पुरस्कारथी व त्यांचे मित्रपरिवार चे तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नळधारकाची नादुरुस्त जोडणी केली बंद मनपाची कार्यवाही नागरिकांनी पाण्याचा अपव्यय न करण्याचे आवाहन

लातूर/ प्रतिनिधी: शहरातील गुळ मार्केट चौकात नादुरुस्त नळ जोडणीमुळे पाण्याची गळती होत असल्याचे लक्षात आल्यानंतर मनपाकडून तातडीने कार्यवाही करत ती जोडणी तोडण्यात आली. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहनही मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील गुळ मार्केट चौकात एका नळ धारकाची जोडणी नादुरुस्त होती.सोमवारी त्यातून पाण्याची गळती होत असल्याचे निदर्शनास आले.ही बाब लक्षात घेता मनपाने मंगळवारी (दि.२८)तातडीने कार्यवाही करत पाण्याची गळती नेमकी कोठून होत आहे याचा शोध घेतला. मनपाच्या मुख्य वाहिनीला गळती नसल्याचे यातून स्पष्ट झाले परंतु एका नळ जोडूनीतून ही पाणी गळती होत होती.पालिकेने तातडीने ती नळ जोडणी बंद केली.यामुळे पाण्याची होणारी गळती थांबली आहे.

सध्या लातूरकरांना मांजरा प्रकल्पातील मृत साठ्यातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी मनपा काळजी घेत आहे.या बाबीची दखल घेत शहरातील नागरिकांनीही पाणी जपून वापरावे.ज्या नळ धारकांच्या जोडण्या नादुरुस्त आहेत त्यांनी त्या तातडीने दुरुस्त करून पाण्याची नासाडी थांबवावी.पाण्याचा अपव्यय करू नये.उपलब्ध पाणी जपून वापरावे. नळाला तोट्या बसवाव्या. अद्याप पावसाळा सुरु झालेला नसल्याने प्रकल्पात पाणीसाठा लवकर होणार नाही. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी.जे नागरिक नादुरुस्त नळ जोडणीमुळे पाण्याचा अपव्य करतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केली जाईल,असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

# संतप्त नागरिकांनी केले अवैध दारूचे दहन

औसा : प्रतिनिधी तालुक्यातील भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असलेल्या औसा तालुक्यातील शिवली येथील संतप्त नागरिकांनी मंगळवारी संध्याकाळी अवैध दारू पकडून जाळून टाकल्याची घटना घडली आहे. घटनास्थळी उपस्थित पोलीस कर्मचा-यासमोर वारंवार सांगूनही अवैध दारूची विक्री बंद होत नसल्याचा रोष व्यक्त करीत पोलीसांच्या कर्तव्यावर नाराजी व्यक्त केली आहे.

भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवली येथे मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू असून या अवैध धंद्यावर कारवाई करण्याची मागणी येथील नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे मात्र भादा पोलीसांकडून ठोस कारवाई होत नसल्याने निर्ढावलेल्या अवैध धंदेवाल्याचे मनोबल वाढले आहे. दररोज दहा ते पंधरा बॉक्स अवैध मार्गाने विक्री होत असल्याचे यामधून दररोज हजारो रुपयांची कमाई केली जात आहे. अवैध धंद्यामुळे गावात तंटे वाढले असून महिलांना याचा नाहक त्रास होत आहे. यामुळे संतप्त नागरिकांनी पोलीसांच्या कर्तव्यावर नाराजी व्यक्त करीत स्वत च गावात पुरवठा होणारी दारू पकडून जाळून टाकली.

# धाराशिव जिल्ह्यात महसूल कर्मचा- यांचे बेमुदत कामबंद आंदोलन

धाराशिव : प्रतिनिधी धाराशिव उपविभागाचे उपविभागीय अधिकारी (महसूल) डॉ. योगेश खरमाटे, मंडळ अधिकारी हनुमंत कुदळे, तलाठी जी. आर. शिंदे, पोलीस पाटील चंद्रकांत मगर पाटील यांच्यावर चुकीच्या पद्धतीने व हेतुपुरस्पर फसवणुकीचा गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली. आनंद पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी यांनी केलेल्या या कारवाईचा महसूल कर्मचा-यांच्या विविध संघटनांनी निषेध करून त्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. संबंधित पोलीस अधिका-यावर गुन्हा दाखल करून निलंबित करावे, या मागणीसाठी महसूलच्या सर्वच कर्मचा-यांनी मंगळवारपासून (दि. २८ मे) बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत संबंधित पोलीस अधिका-यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.उपविभागीय अधिकारी कार्यालयात पोलीस पाटलाची तक्रार करणा-या तक्रारदाराचे बनावट शपथपत्र तयार करून, त्यावर बनावट सही केली. तक्रारदाराने दिलेली तक्रार मागे घेतल्याबाबतचा खोटा जबाब तयार केला. त्यानंतर संबंधित पोलीस पाटलास मुदतवाढ देण्यात आली. या प्रकरणी बरमगाव बु. ता. धाराशिव येथील गणेश



शिवाजी जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिवचे तत्कालिन उपविभागीय अधिकारी डॉ. योगेश खरमाटे, अंबेजवळगा मंडळाचे मंडळ अधिकारी हनुमंत कुदळे, शिंगोली सज्जाचे तलाठी जी. आर. शिंदे, शिंगोलीचे पोलीस पाटील चंद्रकांत मगर पाटील यांच्या विरोधात भा.द.वि.सं. कलम ४२०, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये दि. २६ मे रोजी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांना पोलीसांनी अटक केली आहे. न्यायालयाने या तीघांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. मंडळ अधिकारी व तलाठी, पोलीस पाटील यांना जामीन मंजूर झाला आहे.

महसूल अधिकारी, कर्मचा-यांच्या विरोधात चुकीच्या पद्धतीने, हेतुपुरस्पर व संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांची परवानगी न घेता गुन्हा दाखल केल्याने महसूल विभागातील विविध संघटना आक्रमक झाल्या आहेत. त्यांच्या शिष्टमंडळाने मंगळवारी जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. संबंधित पोलीस अधिका-यावर कारवाई करावी, त्यांना निलंबित करावे, यासाठी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कारवाई केल्याशिवाय आंदोलन मागे न घेण्याचा इशारा विविध संघटनांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी शिष्टमंडळात धाराशिव जिल्हा तलाठी व मंडळ अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष विशाल खळदकर, जिल्हा सरचिटणीस संजय माळी, विभागीय अध्यक्ष गोपाळ आकोस्कर, जिल्हा कार्याध्यक्ष सुहास जेवळीकर, महादेव गायकवाड, सचिन पवार, जिल्हा उपाध्यक्ष अश्विनी निंबाळकर, समाधान जावळे, श्रीनिवास पवार, एन. डी. नागटिळक, राजेश पडवळ, सर्व तालुकाध्यक्ष, जिल्ह्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार संघटना, महसूल कर्मचारी संघटना, कोतवाल संघटना, पोलीस पाटील संघटनांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# डाळ साठा तपासणीला सोमवारपासून सुरूवात

लातूर : विनोद उगीले जिवनावश्यक वस्तुची उपलब्धता व किंमतीत स्थिरता राखण्याचा कायद्या आमलात येऊन तो कागदावरच राहिल्याने दाळ उत्पादनात आघाडीवर असलेल्या लातूरात डाळ उत्पादक व व्यापा-यांनी 'दाल' साठवणूकीचा 'काला' केल्यानेच आज घडीला तुरदाळ १८० रूपये प्रतिकिलो दरा पर्यंत पोहचली आहे. असे असताना डाळींच्या किरकोळ किमतींवर अंकुश ठेवण्यासाठी या डाळींचा साठा करण्यास केंद्रशासनाने निर्बंध घालत डाळीचा साठा तपासणीचे आदेश देऊन ही जिल्हा पुरवठा विभाग मात्र कागदी घोडे नाचवत हातावर हात धरून होता. या संदर्भात दैनिक एकमतने 'महागाईच्या तडक्यामागे डाळ साठवणूकीचा काला!' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करताच जिल्हा पुरवठा विभाग खडबडून जागा झाला आहे. जिल्ह्यातील डाळींचे आयातदार, मिलर्स, स्टॉकिस्ट्स घाऊक विक्रते त्यांच्या रडारवर आली असून सोमवार पासून जिल्ह्यात महसूल प्रशासनाकडून डाळसाठा तपासणीला सुरूवात झाली आहे. लातूर जिल्ह्याची ओळख डाळींच्या पिकांसाठी आहे. येथे तूर, हरभरा, उडीद आणि मूग ही पिके घेतली जातात. लाल रंगाच्या तुरीचे आगर म्हणून 'लातूर' हे नाव पडले, असेही म्हटले जाते. शिवाय, शेजारच्या कर्नाटक राज्यातून मोठ्या प्रमाणात तूर विक्रीसाठी लातूर व उदगीरला आणली जाते. येथील बाजार समितीत त्याच दिवशी माप होऊन शेतक-यांना पैसे दिले जातात. राज्यातील इतर बाजारपेठांच्या तुलनेत चांगला दर मिळतो. त्यामुळे महाराष्ट्राबरोबरच तेलंगणा, कर्नाटकातून शेतमाल विक्रीसाठी येतो. तसेच लातूर हे डाळींचे आगार असून येथून संपूर्ण देशभरात डाळींची निर्यात होते. जिल्ह्यातील जवळपास १४० डाळ मिलमधून रोज तीन ते साडेतीन हजार टन डाळ तयार होते. अख्या भारताला इथल्या डाळीचा पुरवठा होतो. ही डाळ आंध्र प्रदेशातील कर्नुलपासून तमिळनाडूतील कन्याकुमारीपर्यंत पाठवली जात आहे. त्यामुळे लातूरला डाळींचे आगार मानले जाते. आता हेच लातूर तुरडाळीचे दर गगणाल भिडत चालल्याने चर्चेत आले आ हे. डाळ उत्पादकांनी व व्यापा-यांनी डाळीचा अनाधिकृत पणे जिल्ह्यातील शकडो वेअर हाऊस मध्ये साठा केल्यानेच तुरडाळीच्या दरात वाढ होत चालल्याचे बोलले जात आहे. याकडे संबधित महसूल विभागाचे व जिल्हा पुरवठा विभागाचे अक्षम्य असे दुर्लक्ष होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE